The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत चोखामेळा यांचे जीवन व कार्य

प्रा. डॉ. प्रेमला मुखेडकर
डॉ. सौ. इं. भा. पाठक महिला महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर

**प्रास्ताविक :** वेदशास्त्र प्रमाण माणनाऱ्या सनातन धार्माचाच भागवत धर्म हा नव्या व लोकप्रिय धर्माची स्थापना संत ज्ञानेश्वरांनी केली. संत नामदेवांनी समताधर्माचा झेंडा पंढरपूरमध्ये फडकावला. त्या काळी सामाजिक परिस्थिती अतिशय विषम स्वरूपाची होती. नामदेवांनी सर्व स्थरातील लोकांना एकाच ध्वजाखाली येण्याची हाक दिली. त्यांच्या प्रेरणेने त्या काळात बहुजन समाजातील कोणत्याही जातीच्या माणसाला भक्तिमार्गाने जाऊन आध्यात्मिक प्रगती करता येते, दु:खावर विजय मिळविता येतो असा विश्वास लोकांच्या मनात निर्माण झाला. अशावेळी महार जातीतील चोखामेळा या ध्वजाखाली निर्भयपणे येऊन उभे राहिले. संतांचे, मानवतेचे, शांततेचे, उच्च नैतिकतेचे जीवन व तत्त्वज्ञान संत चोखामेळा यांनी आत्मसात केले. सामाजिकदृष्ट्या अवमानल्या गेलेल्या कुळामध्ये जीवन जगताना चोखामेळांनी आपल्या भक्तिबळावर व आत्मनिष्ठेवर एवढे मोठे स्थान प्राप्त करून घेतले आहे की, सर्व मानवजातीला ते मार्गदर्शक ठरेल. परिस्थिती चहुबाजूंनी कितीही प्रतिकूल असली तरी तिच्यावर मात करून प्रयत्नांनी तो संतपद मिळवू शकतो. हे त्यांनी स्वत:च्या उदाहरणाने दाखवून दिले. त्यांच्या या अतुलनीय कार्यामुळे इतर समाजातील लोक सुद्धा वारकरी संप्रदायात येऊ लागले.

या संप्रदायाबद्दल आकाशवाणी मुंबई येथून बोलताना प्रा गं. बा. सरदार म्हणतात, "मराठी संतांच्या भक्तिसंप्रदायाने महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या धर्मजीवनाला आध्यात्मिक अधिष्ठान मिळवून दिले. संकुचित ग्रामजीवनाच्या ठराविक चाकोरीत पिढ्यान् पिढ्या खिचपत पडलेल्या शुद्रातिशुद्रांना त्यांनी अंतर्मुख बनविले आणि त्यांच्या अंतःकरणात आत्मोन्नतीची प्रेरणा निर्माण केली. अठरापगड जातीच्या लोकांसाठी ज्ञानेश्वर प्रभृति संतांनी मोक्षसुखाचे अन्नछत्र घातले 'सकळांसी येथे आहे अधिकार' या न्यायाने भागवतधर्माच्या विशाल मंदिरात हा ब्राह्मण, हा शुद्र, हा अंत्यज असा भक्तिप्रपंच नव्हता. त्यामुळे शुद्रतिशुद्र साहजिकच या वारकरी पंथाकडे ओढले गेले. पांडुरंग भावाचा भुकेला आहे. ज्ञानेश्वरांपासून ते चोखामेळ्यापर्यंत सर्व जातीचे भक्त विठ्ठलाला सारखेच प्रिय आहेत असा भाव निर्माण झाला."

संत चोखामेळा यांचे 349 अभंग उपलब्ध आहेत. त्यांच्या अभंगातून विठ्ठलवर्णन, नाममहिमा, पंढरी महात्म, आत्मनिवेदन, इतर संतविषयक, याति विहीनतेचे दु:ख, विटाळविषयक, गुरुस्तुती, जोहाराचे अभंग, उपदेशपर, समाजस्थिती इ. विविध विषयावर चोखामेळा यांनी अभंगरचना केलेली आहे. त्यांचे अभंग अनेकविध दृष्टींनी अभ्यासण्याजोगे आहेत. एका सर्वसामान्य भक्ताचा अध्यात्माच्या वाटेवरचा प्रवास त्यांच्याद्वारे परिणामकारकरित्या शब्दबद्ध झालेला आहे. तसेच अतिशय उत्कृष्ठ भावदर्शनही त्यांतील अनेक

रचनांमधून घडते. वाङ्मयीनदृष्ट्या चोखामेळा यांची कविता उलगडून पाहण्याजोगी आहे. संत चोखामेळा यांच्या जन्मासंदर्भात एक लोककवन प्रसिद्ध आहे.

देवानें चोखिला काय वर्णू लीला । नावं चोखामेळा ठेवियले ॥
नामा म्हणे धन्य अनुपम्य लीला । भक्तांचा कळवळा देव पाळी ॥

शेवटच्या 'नामा म्हणे' या चरणावरून हे कवण नामदेवाचे आहे असे म्हणावे लागे. परंतु उपलब्ध असलेल्या नामदेवांच्या समग्र अभंगगाथेत हे सापडत नाही. या लोककवणातून सांगितलेली चोखामेळा यांची जन्मकहाणी अशी आहे की, कोरेगावचा पाटील फार भाविक आणि एकनिष्ठ विठ्ठलभक्त होता. कोणतीही नवीन वस्तू किंवा फळे तो प्रथम विठ्ठलाला दिल्याशिवाय स्वत: वापरत नसे. एके वर्षी पाटलाकडे खूप आंबे आले. त्यातील उत्तम सव्वाशे आंबे निवडून त्यांनी येसकर सुदाम यांना पंढरपूरला पाठविले. सुदाम आणि त्याची पत्नी सावित्रीबाई यांनी डोक्यावर आंबे व पाटलांनी बडव्यांना दिलेली चिठ्ठी घेऊन पंढरपूरला निघाले. हे दाम्पत्य विठ्ठलभक्त होते. विठ्ठलाचे चिंतन करीत एक एक पाऊल टाकत होते. विठूरायांच्या मंदिराचा कळस पाहण्यासाठी आतुर झाले होते. पंढरपूरापासून अवघ्या दोन कोसावर असताना विठ्ठलाने वृद्ध ब्राह्मणाचे रूप घेऊन त्यांच्यापुढे आले. मला खूप भूक लागली आहे काहीतरी खायला द्या अशी विनंती केली. सुदाम म्हणाला, आमच्याजवळ काहीही नाही. शिवाय आम्ही महार आहोत. आपल्यासरख्या ब्राह्मणाला आम्ही काय द्यावे ? सावित्रीला मात्र त्या वद्ध ब्राह्मणाची दया आली. तिने त्याला एक चांगला आंबा निवडून दिला. ब्राह्मणाने तो आंबा चोखला आणि आंबट आहे म्हणून परत केला. सावित्रीबाईस आंबा आंबट निघाला म्हणून खूप वाईट वाटले तो उष्टा आंबा पाटीत न ठेवता तिने आपल्या ओटीत ठेवला.

पुढे हे दाम्पत्य पंढरीस आले. त्यांनी बडव्याकडे आंबे व चिठ्ठी दिली. बडव्यांनी आंबे मोजून पाहिले तर एक आंबा कमी भरला. त्यांनी जाब विचारला, तेव्हा सावित्रीबाईंनी सर्व हकिकत सांगितली आणि तो चोखलेला आंबा दाखविण्यासाठी आपल्या ओटीत हात घातला तर तेथे आंब्याऐवजी एक सुंदर बालक होते. हा पांडुरंगाचाच आशीर्वाद आहे हे त्यांना कळले. देवाने आंबा चोखला व प्रसादाचे मूल झाले असे समजून त्या बालकाचे नाव 'चोखोबा' ठेवण्यात आल्याचा उल्लेख आढळतो. आजच्या विज्ञान युगात हे पटत नसले तरी याला काही तरी अर्थ नक्कीच असावा. निपुत्रिक असलेल्या या विठ्ठलभक्त दाम्पत्याला विठ्ठल कृपेने पुत्र झाला हे खरे

आपल्या आत्मनिवेदनपर अभंगात चोखामेळा स्वत:स रामयणकालीन नील अवतार संबोधतात. मागील जन्मास कृष्णनिंदा घडल्यामुळे आपल्याकडून पाप झाले व आपणास हीन समजल्या जाणाऱ्या महार जातीत जन्म मिळाला असे ते सांगतात.

शुद्ध चोखामेळा । करी नामाचा सोहळा ॥
मी यातिहीन महार । पूर्वी निळाचा अवतार ॥
कृष्णनिंदा घडली होती । म्हणोन महार जन्मप्राप्ती ॥
चोखा म्हणे विटाळ । आम्हा पूर्वी हे फळ ॥

आपल्या मागे जो विटाळ लागला आहे ते पूर्वजन्मांचे फळ आहे असे ते म्हणतत. परंतु यामागे वेगळे कारण असले पाहिजे. कारण त्या काळात जातीचे बंधन अतिशय कठोर होते. चोखोबांना आपल्या मनातील दु:ख लोकांसमोर मांडावयाचे होते म्हणून कदाचित त्यांनी पूर्वजन्मीचा आधार घेतलेला असावा असे वाटते.

हीन याती माझी देवा । कैसी घडे तुझी सेवा ॥
मज दूर दूर हो म्हणती । तुज भेटू कवण्या रीता ॥
माझा लागताची खर। सिंतोडा घेताती करार ॥
माझ्या गोविंदा गोपाळा । करूणा भाकी चोखामेळा ॥

अस्पृश्य असणाऱ्या जातीमध्ये जन्म घेतल्यामुळे सगळेच माझा तिरस्कार करतात दूर हो दूर हो म्हणतात. आपण विठ्ठलाला भेटू शकत नाही. आपण त्यांची सेवा करू शकत नाही याचं दु:ख अनेक अभंगातून चोखामेळा व्यक्त करतात.

काय हे दु:ख किती या यातना । सोडवी नारायणा यातोनिया ॥

चोखामेळा यांच्या या उद्गारावरून त्यांच्या दु:खी जीवनाची कल्पना येते. दु:ख निवारण्यासाठी त्यांनी नाना प्रकारचे रूढ मार्ग अवलंबूनही त्यांना काही उपयोग झाला नाही. अखेर चंद्रभागेच्या वाळवंटांवर त्यांचे मन विसावते. विठ्ठलाच्या दर्शनाने त्यांचा शीणभाग नाहीसा होऊन त्यांना वेगळेच समाधान मिळते.

पूर्व जन्माच्या पापाने जरी मनुष्य दुख भोगीत असला तरी तो वर्तमान आयुष्यात सत्कर्म व भक्तिबळावर या दु:खातून मुक्त होऊ शकतो हे चोखोबांनी दाखवून दिले आपल्या कृतीने आणि भक्तीने ते शेवटी देवाच्या श्रेष्ठ भक्तांमध्ये जाऊन बसले.

या सर्व दु:खातून बाहेर पडण्यासाठी संतसंग चोखोबांना महत्त्वाचा वाटतो. पंढरपुरातील वास्तव्य व नित्य चंद्रभागेचे स्नान त्यांना घडत होते. महाद्वारात उभे राहून नामचिंतन ते करत होते. वैराग्य व समाधान ही त्यांची भूषणे होती. संत नामदेवांनी त्यांना मंत्रोपदेश देऊन कृतार्थ केले होते. सद्गुरूंच्या ठिकाणी त्यांची निस्सीम भक्ती व दृढभाव होता. शुद्ध आचरण हे त्यांच्या जीवनाचे सूत्र होते. या सर्व साधनांनिशी त्यांनी गुरुचरणांची उपासना केली व कृतार्थ झाले. पुढील अभंगामधून आपल्याला आपल्या गुरूने कोणता मंत्र दिला, मुक्तीचा मार्ग कसा दाखविला हे सांगताना चोखोबा म्हणतात,

धन्य धन्य नामदेवा। माझा विरसला भेव ॥
विठ्ठल मंत्र त्रिअक्षरी । खूण सांगितली निर्धारी ॥
ठेवोनी माथा हाता। दिले माझे मज हित॥
दावियले तारू। चोखा म्हणे माझा गुरू॥

पूर्वीच्या काळी महार समाज हा येसकरही करायचा. गावकी करायचा. गावातील उच्च वर्णातील एखादी व्यक्ती समोर आली तर त्यांना राम राम किंवा नमस्कार घालण्यास बंदी होती त्याऐवजी ते 'जोहार मायबाप' म्हणत. या जोहाराचे वर्णन करताना चोखोबा म्हणतात -

जोहार मायबाप जोहार। तुमच्या महाराचा मी महार ॥
बहु भुकेला जाहलो। तुमच्या उष्ट्यासाठी आलो ॥
बहु केली आस। तुमच्या दासाचा मी दास ॥
चोखा म्हणे पाटी। आणिली तुमच्या उष्ट्यासाठी ॥

महार जातीमध्ये गावात येसकरकी करत असताना दारोदारी फिरून संध्याकाळी अन्न मागण्याची पद्धत होती. चोखोबा म्हणतात की, मी हातामध्ये पाटी घेऊन आलो आहे. मला तुमच्या उष्ट्याची आस आहे. कृपा करून मला काहीतरी द्या अशी विनंती ते या अभंगात करतात. यावरून महारांची दैन्य, दु:ख, दारिद्रयाची कल्पना येते.

निर्गुण परमतत्व सगुण रूप धारण करू लागले की ते मुळापासून ढळते आणि अपवित्रतेला सुरुवात होते. तिच्यापासून कोणतीच सुटका नाही, असे चोखोबा म्हणतात. फक्त विशिष्ट जातीपुरतीच ती असते, असे नव्हे, तर जगाच्या उत्पत्तीपासूनच तिला प्रारंभ होतो. निर्गुण निराकाराची स्थिती हीच सर्व प्रकारच्या विटाळापासून मुक्त असण्याची स्थिती होय, जी देवादिकांनाही लाभलेली नाही. अस्तित्व आले की विटाळ आलाच असे ते आपल्या अभंगातून सुचवितात.

पंचही भूतांचा एकची विटाळ। अवघाची मेळ जगी नांदी ॥
तेथे तो सोवळा वोवळा तो कोण। विटाळाचे कारण देह मूळ॥
आदि अंती अवघा विटाळ संचला। सोवळा तो झाला कोण न कळे ॥
चोखा म्हणे मज नवल वाटते। विटाळापुरते आहे कोण॥

चोखोबाचे दु:ख वस्तुत: साऱ्या अस्पृश्य समाजाचे दुख आहे. मात्र त्यांच्या अभंगातून ते मुख्यत्वे वैयक्तिक वेदना म्हणून व्यक्त होताना दिसते. आपल्या समाजाच्या स्थितीचे वर्णन करताना चोखोबा लिहितात,

येथे तो संग आहे दुर्जनांचा। म्हणोनी शीण त्याचा होत आहे॥
यातीचा प्रकार अमंगळ खाणार। मद्यमांस आहार करिताती॥
मुखे ते वाईट बोलती कश्मळ। तेणे हळ हळ जीव करी ॥
चोखा म्हणे ऐसा पडिलो काचणी। सोसू हे जाचणी काठेवरी॥

वारकरी संप्रदायाचा आधारधर्म स्वीकारलेल्या चोखोबांना वैष्णवांचाच सहवास अधीक हवासा होता. त्यातच ते रमत असावेत. त्यामुळे मांसाहारापासून दूर असलेल्या वारकऱ्याप्रमाणे एकादशीचा उपवास करणाऱ्या शुद्ध आचरण असलेल्या चोखेबाला मद्य पिणाऱ्या, मांस खाणाऱ्या आपल्या समाजाशी एका मर्यादेपलिकडे एकरूप होणे कठीण जात असावे असे दिसते.

संत चोखामेळा यांचे विठ्ठलावर आधारित 55 अभंग उपलब्ध आहेत. या अभंगातून चोखोबाला विठ्ठलाचे जे रूप दिसले त्याचे वर्णन आलेले आहे.

अनादि निर्मळ वेदांचे जे मूळ। परब्रह्म सोज्वळ विटेवरी॥
कर दोन्ही कटी राहिलासे उभा। नीळवर्णप्रभा फांकतसे॥
आनंदाचा कंद पाऊले साजिरी। चोखा म्हणे हरी पंढरीचे॥

अस्पृश्य असल्यामुळे चोखोबाला विठ्ठलाचे प्रत्यक्ष कधी दर्शन घेता आलेले नसले तरी या अभंगातून मात्र कटावर दोन्ही हात ठेवून उभा असलेला निळा सावळा विठ्ठलाचं खूप सुंदर चित्रण चोखोबांनी अनेक अभंगातून केले आहे.

पांडुरंग चोखोबाच्या घरी जेवायला गेल्याचे उल्लेख अनेक संतांच्या अभंगातून येताना दिसतात. संत चोखामेळाही एका अभंगात लिहितात -

विठोबा पाहुणा आला आमचे घरा। निंबलोण करा जीवेभावे॥
पंचप्राण ज्योती ओवाळुनी आरती। ओवाळीला पती रखुमाईचा॥
षड्रस पक्वानाने विस्तारिले ताट। जेवू एकवट चोखा म्हणे॥

संत चोखामेळा यांनी आपल्या अभंगातून नामस्मरणाला फार मोठे स्थान दिलेले आहे. परमेश्वर भक्तीचा अत्यंत सोपा मार्ग म्हणजे नामस्मरण.

नामाचे सामर्थ्य विष ते अमृत ।ऐसी हे प्रचीत आहे जीवा ॥
ते नाम सोपे विठ्ठल विठ्ठल ।नको काळ वेळ जपे आधी ॥
नेमधर्म काही नलगे साधन ।सुखे नारायण जप करी ॥
चोखा म्हणे मज भरंवसा नामाचा ।येणे कळि काळाचा भेव नाही ॥

विठ्ठल नाम घेण्यासाठी कोणताही वेळ काळ ठरलेला नाही केव्हाही नामस्मरण करू शकतो. जीवनातील विषासमान आलेले अनुभव, दु:ख केवळ नामोच्चाराने दूर होतात असा चोखोबाचा अनुभव आहे. विश्वास आहे.

संत चोखामेळा यांनी आपल्या अनेक अभंगातून पंढरीचे माहात्म्य वर्णीलेले आहे.

अवघी पंढरी भू वैकुंठ नगरी। नांदातसे हरि सर्वकाळ॥
चतुर्भुज मूर्ति शंख चक्र करी। पीतांबरधारी श्यामवर्ण॥
किंवा
वारी पंढरीची तोचि वारकरी। दया क्षमा बरी वसे तेथे ॥
तोचि माझा जीव प्राणाचाही प्राण। जीव ओवाळीन तयावरी॥

पंढरपूर हे या भूतलावरचे वैकुंठ आहे या वैकुंठात विठ्ठल सर्वकाळ उभा आहे. त्या विठ्ठलाला भेटायला पंढरपूरला येणारे ते वारकरी त्यांच्यामध्ये दया, क्षमा हे गुण आहेत. तो माझ्या प्राणाचा प्राण आहे. माझे सर्वस्व आहे अशा त्या पंढरीरायावर मी जीवही ओवाळून टाकेन असं चोखोबा म्हणतात.

संत चोखामेळा यांचे वारकऱ्यांवरही तितकेच प्रेम आहे. वारकरी आणि संत पंढरीस येतात त्यामुळे चोखोबाच्या मनात त्यांच्याविषयी प्रेम निर्माण झाले आहे. त्यांच्या सहवासामुळे आपल्याला पांडुरंगाचे दर्शन होते. संताच्या भेटीचा आनंद व्यक्त करताना चोखामेळा म्हणतात -

आजि दिवस धन्य सोनियाचा। जीवलग विठोबाचा भेटलासे॥
तेणे सुख समाधान झाली विश्रांती। दुजे नाठवती चित्ती काही॥
किंवा
सप्रेम निवृत्ति आणि ज्ञानदेव। मुक्ताईचा भाव विठ्ठलचरणी॥
सोपान सावता गोरा तो कुंभार। नरहरी सोनार प्रेम भरित॥
कबीर कमाल रोहिदास चांभार। आणिक अपार वैष्णवजन॥
चोखा तया पायी घाली लोटांगण। वंदितो चरण प्रेम भावे॥

चोखोबांच्या वाट्यास श्रीमंती आली नव्हती. त्यांच्या नशिबी अठरा विश्वे दारिद्रय होते. या दारिद्रयाचे पांघरूण घेऊन हा महात्मा आपल्या जीवनाची वाटचाल करत होता. ही वाटचाल साधी, सोपी, सरळ नव्हती. पदोपदी अवहेलना आणि दीनत्व वाट्याला आले तरीही त्यांनी आपले मन विचलित होऊ दिले नाही. इंद्रियांना त्यांनी मोकळे सोडले नाही. विठ्ठलाच्या पायी आपली सारी इंद्रिये जखडून ठेवली. त्यांचे भाग्य थोर होते म्हणून त्यांना ज्ञानदेव, नामदेवासारख्या एकनिष्ठ विठ्ठलभक्ताची साथ मिळाली. संत ज्ञानेश्वरांची भावंड, संत गोराकुंभार, नरहरी सोनार, जनाबाई, मुक्ताबाई या सर्वांचं भरभरून प्रेम मिळाले. कर्मठ लोकांनी चोखोबाला कितीही छळले तरी या संताच्या सहवासात त्या दु:खाची तिव्रता कमी झाली ते एक श्रेष्ठ विठ्ठल भक्त झाले आणि संतांच्या दरबारात एक अढळ स्थान त्यांनी त्यांच्या भक्तीने आणि कृतीने निर्माण केले.

संत चोखामेळा यांचा अनेक संतांनी आपल्या अभंगातून गौरव केलेला आहे. संत नामदेव लिहितात -

चोखा माझा जीव चोखा माझा भाव। कुलधर्म देव चोखा माझा॥
काय त्याची भक्ती काय त्याची शक्ती। मीहि आलो व्यक्ती तयासाठी॥
माझ्या चोखियाचे करिती जे ध्यान। तसा कधी विघ्य पडो नेदी॥
नामदेवे अस्थि आणिल्या पारखोनी। घेत चक्रपाणी पितांबरी॥

या अभंगातून संत नामदेवांनी चोखोबाला सर्व काही मानले आहे. जे नरनारी चोखोबांचे स्मरण करतील त्यांना कसल्याही प्रकारची विघ्न येणार नाहीत. श्री पांडुरंगाच्या सांगण्यावरून नामदेवांनी मंगळवेढे येथे जाऊन चोखोबाच्या अस्थी पारखून आणल्यानंतर प्रत्यक्ष पांडुरंगाने त्या अस्थी आपल्या पितांबरामध्ये घेतल्याचे वरील अभंगात सांगितले आहे.

आपल्या भक्तीच्या बळावर त्याने विठ्ठलाला भुलविलेले आहे. त्यांच्या प्रत्येक संकटात देव धावून येतो. त्याच्या प्रत्येक कामात देव मदत करतो. त्यासाठी सर्वांना जनाबाई सांगतात की,

तुम्ही पण विठ्ठल चरणी लागा म्हणजे देव तुम्हालाही पावेल. चोखामेळा यांच्या श्रेष्ठत्वाचे वर्णन करताना जनाबाई म्हणतात -

चोखामेळा संत भला। तेणे देव भुलविला॥
भक्ती आहे त्याची मोठी। त्याला पावती संकटी॥
चोखामेळ्याची करणी। तेणे देव केला ऋणी॥
लागा विठ्ठल चरणी। म्हणे नामयाची जणी॥

संत चोखामेळा यांच्या पत्नी संत सोयराबाई आपल्या एका अभंगात चोखामेळा यांच्या एका दर्शनाने आपले दु:ख, ताप दूर होतात असे म्हणते.

चोखा निर्मळ एक रूप। दरूशने हरे ताप॥
वाचे विठ्ठल नाम छंद। नाही भेद उभयंता॥

तसेच चोखामेळा यांच्या कुटुंबातील सगळेच या परंपरेत आलेले आपण पाहतो. त्यात त्यांची बहिण निर्मळा, मेव्हणा- बंका, मुलगा - कर्ममेळा या सर्वांनी अभंगनिर्मिती केलेली आहे.

**<u>संदर्भ :</u>**

1) स. भा. कदम - संपा. - श्रीसंत चोखामेळा : चरित्र आणि अभंग पृष्ठ 29

**<u>संदर्भग्रंथ</u> :**

1) श्री संत चोखामेळा चरित्र आणि अभंग - संपादक - स. भा. कदम,
शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर

2) वारकरी संप्रदाय आणि महाराष्ट्रातील संत - प्रा. डॉ. संतोष चव्हाण,
चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद